


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७४४. वा शुक्रवार दि. १९ एप्रिल २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# सभा-पदयात्रांचा प्रतापरावांचा जोरदार धडाका...

## मोदींचा विकासाचा चेहरा पाठीशी, मित्रपक्षांचेही मिळतेय बळ















**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सध्या ऐन रंगात आली आहे. प्रत्येक पक्षाची उमेदवार प्रचारासाठी जोरदार ताकद लावत आहेत. राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह अपक्षांनीही जोरदार कंबर कसली आहे. भाजप-शिवसेना व इतर मित्रपक्षांचे उमेदवार तथा खासदार प्रतापराव जाधव यांनीही प्रचाराचा जोरदार धडाका लावला. सभा आणि पदयात्रांच्या माध्यमातून ते जनतेपर्यंत आपली भूमिका पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. एकीकडे प्रतापराव जाधव केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारद्वारा करण्यात आलेल्या विकास कामांची माहिती देत आहेत, तर दुसरीकडे ते जिल्ह्यात आपल्या खासदारकीच्या कार्यकाळातील कामांचा पाढा वाचत आहेत. बुलढाणा लोकसभा निवडणुकीत कोणाला उमेदवारी प्राप्त होईल, याबाबत सुरवातीला मोठी साशंकता होती. उमेदवारी घोषित होण्यास विलंब लागत होता. परंतु अखेर भाजप-शिवसेनेच्या पक्षश्रेष्ठींनी प्रतापराव जाधव यांच्यावरच विश्वास व्यक्त केला व त्यांची उमेदवारी घोषित केली. प्रतापरावांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर लगेच प्रचाराला सुरवात केली. सध्या प्रतापराव भल्या पहाटे प्रचाराला लागतात, तर रात्री उशिरापर्यंत त्यांचा प्रचार सुरूच असतो. प्रचाराच्या भाषणात बोलताना प्रतापराव सांगतात की, केंद्रात गेल्या दहा वर्षांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. या सरकारने सबका साथ, सबका विकास हा नारा देत देशात विकास केलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील विकासाचा सर्वांत मोठा चेहरा आज बनलेले आहेत. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान मोदी यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यापैकी एक म्हणजे अयोध्येत बहुप्रतीक्षित असे भव्य-दिव्य राम मंदिर निर्माण करणे असो की, जम्मू-काश्मिरातील कलम ३७० रद्द करणे असो. सगळ्या ठिकाणी त्यांनी प्रचंड कठोरता दाखवली आहे. यापुढील काळात देखील अनेकविध उपक्रम राबवायचे असल्या कारणाने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी यांचे सरकार देशात आणणे गरजेचे आहे, त्यामुळे मला प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन ते जनतेला करीत आहेत. प्रतापराव यांच्यासोबत भाजप-शिवसेनेसह रिपाइं आठवले गट, राष्ट्रीय समाज पक्ष, मनसेचे कार्यकर्ते देखील दिसून येत आहेत. सर्वच मित्रपक्षांचे आमदार, माजी आमदार, पक्षांचे पदाधिकारी, माजी जि. प. सदस्य, पं. स. सदस्य, तसेच ग्रामपंचायत सदस्य-सरपंचही दिसून येत आहेत. शिवसेनेचा सर्वांत जुना मित्र पक्ष असलेल्या भाजपमध्ये पूर्वी काही प्रमाणात प्रतापरावांविषयी नाराजीचा सूर उमटला होता. अनेक भाजपच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नाराजीचा सूर लावला होता. परंतु आता भाजपचे झाडून सगळे कार्यकर्ते प्रतापरावांच्या प्रचारात पूर्ण ताकदीने उतरल्याचे पहायला मिळते आहे. आपण पुन्हा लोकसभेवर निवडून आल्यास मित्रपक्षांचे पदाधिकारी तसेच जनतेला योग्य तो न्याय देऊ, असे आश्वासन देत आहेत. प्रतापरावांविषयी आता मित्रपक्षांच्या नेते-कार्यकर्त्यांमध्ये कोणताही किंतु-परंतु नसल्याचेच यातून दिसून येते. जागोजागी भाजप-शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचे मेळावे, प्रत्यक्ष जनतेशी भेटी-गाठी, कॉर्नर सभा, पदयात्रा, अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी वैयक्तिक संवाद, असा प्रतापरावांचा दिनक्रम सध्या सुरू आहे. एक-दोन दिवसांत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा खामगावात होण्याचे संकेत आहेत. ती सभा प्रतापरावांसाठी चांगलीच लाभदायी ठरण्याची शक्यता दिसून येत आहे. जिल्ह्यात भाजप-शिवसेनेच्या स्टार प्रचारकांच्याही सभा झाल्या आहेत आणि काही सभा होऊ घातल्या आहेत. ज्याचा पुर्ण फायदा प्रतापरावांना होऊ शकतो.

# दुसरबीड समृध्दी महामार्गाच्या टोलनाक्यावर २ लाख रुपयांची रोकड जप्त...

## स्थिर सर्वेक्षण पथकाने केली धडाकेबाज कार्यवाही...



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

निवडणूक काळात आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणी सह कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या वाहनांची तपासणी करून त्यात काही गैर कायदेशीर बाबी आढळल्यास किंवा रक्कम आढळून आल्यास योग्य कारवाई करण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथकाची स्थापना करण्यात येते. निवडणूक काळात कुठलाही गैर कारभार होऊ नये, मतदारावर चुकीच्या पद्धतीने प्रभाव पाडण्याचा प्रयत्न होऊ नये, गैर कृत्यांना आळा बसावा तथा निवडणुका या निकोप,भयमुक्त,पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात यासाठी स्थिर सर्वेक्षण पथकांची भूमिका महत्वाची ठरते. दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास दुसर बीड येथील समृद्धी महामार्ग छत्रपती संभाजी नगर एक्झिट पॉईंट येथे स्थिर सर्वेक्षण पथकाकडून एकूण दोन लाख रुपयांची रोकड पकडण्यात आली. मुंबई वरून येणारी इनोव्हा या गाडीमध्ये ही रोकड रक्कम पथक प्रमुख श्री. योगेश कांबळे, सहायक श्री. राजेंद्र गहिरराव, पोलीस शिपाई श्री. मांटे, फोटोग्राफर श्री. सरडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यवाही करण्यात आली. मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाचे नोडल अधिकारी श्री. डॉ. श्रीकृष्ण वेणीकर यांनी पुढील कार्यवाही पूर्ण केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सिंदखेडराजा येथे ईव्हीएम मशीन चे सिलिंगचे काम प्रगतीपथावर...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १८ एप्रिल आणि १९ एप्रिल २०२४ रोजी ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करण्याचे काम आजपासून मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाले आहे. सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये ई.व्ही. एम. आणी व्ही.व्ही पॅट मतदान यंत्र याबाबत तालुक्याला एकूण (कंट्रोल युनिट ४२०, एकूण बॅलेट युनिट ४२०, ४५२ प्राप्त झाले आहेत त्या सर्व ई.व्ही. एम. आणी व्ही. व्ही पॅट मशीनचे सिलिंगचे काम आज दि १८ एप्रिल सकाळी ८ वाजल्यापासून सुरु झाले आहे. आजच्या या ई.व्ही.एम आणि व्ही. व्ही. पॅट मशीनचे सिलिंग-चे कामासाठी मा. उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, नायब तहसीलदार डॉ अस्मा मुजावर श्रीमती एसडीपीओ मनीषा कदम, मा. तहसीलदार सिंदखेडराजा श्री. प्रवीण धानोरकर, मा. तहसीलदार देऊळगाव राजा श्रीमती वैशाली डोंगरजाळ, मा. नायब तह-सीलदार श्री. मनोज सातव, मा. नायब तहसीलदार श्रीमती डॉ.अस्मा मुजावर, मा. गटविकास अधिकारी सिंदखेडराजा श्री. डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, मा. गटविकास अधिकारी देऊळगांव राजा श्री. मुकेश महोर ,मा. मुख्याधिकारी



सिंदखेड राजा श्री प्रशांत व्हटकर, मा. मुख्याधिकारी देऊळगावराजा श्री. अरुण मोकळ, मा. नायब तहसीलदार श्री. नितीन बढे, मा. नायब तहसीलदार श्रीमती प्रांजल पवार, प्रसार माध्यम नोडल अधिकारी श्री. अंकुश म्हस्के, उमेश गरकळ, प्रकाश शिंदे, संजय सोनुने तसेच सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# कौटुंबिक वादावरुन नंणद व भावजयीच्या परस्पर तक्रारीवरुन गुन्हे दाखल

**जनसंचलन/ खामगाव**

कौटुंबिक वादावरुन नंणद व भावजयीच्या परस्पर तक्रारीवरुन शहर पोस्टेला विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबत सौ. रुथ शलमोन अढाव वय ४५ रा. बोबडे कॉलनी यांनी शहर पो. स्टे. ला तक्रार दिली की, त्यांचा भाऊ ॲड. विजय पमनानी याचा पत्नी सुनिता पमानानी हिच्यासोबत कौटुंबिक वाद असून घटस्फोटाची पुणे कोर्टात केस सुरु आहे. त्या दोघांचा राधेय नामक मुलगा असून त्याने न्यायालयात वडिलांसोबत राहण्याचे सांगून तो त्याच्या वडिलांसोबत पुणे येथे राहतो. दरम्यान ॲड. विजय पमनानी यांना कामानिमित्त बाहेरगावी जायचे असल्याने त्यांनी मुलगा राधेयला आत्या सौ. रुथ अढाव यांच्याकडे खामगाव येथे चार-पाच दिवसासाठी आणून दिले. दरमयान १६एप्रिलच्या पहाटे साडेतीन वाजेदरम्यान ही तीन अनोळखी इसमांना घेवून त्यांच्या घरात घुसली वअश्शील शिविगाळ करीत घरातील सामानाची फेकाफेक करुन तुम्ही माझ्या मुलाला किडनॅप केले आहे. तुम्ही त्याला ख्रिश्चन बनवू इच्छिता. असे म्हणून चापटा, बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच किचनमधील स्टीलचा जग फेकुन मारला. तसेच मुलगा राधेय याला ओढताण करुन जबरदस्तीने गाडीत बसवून घेवून गेली. या तक्रारीवरुन पोलिसांनी सुनिता विजय पममानी हिच्याविरुध्द कलम ४५७, २९४, ३२३,४२७, ५०६ भादंविनुसार गुन्हा दाखल केला. तर दुसऱ्या बाजुने सौ. सुनिता विजय पममानी वय ३९ रा. पुणे यांनी शहर पो.स्टे. ला दिलेल्या तक्रारीत नमूद आहे की, त्या मंगळवारी पहाटे बोबडे कॉलनीत सौ. रुथ शलमोन अढाव यांच्या मुलाचा शोध घेण्यासाठी गेल्या असता नणंद बिंदू अढाव हि त्यांच्या अंगावरधावून आली व पाण्याचा जग हा-तावर मारला. तसेच अश्लिल शिवीगाळ करुन धमकी दिली. त्याचप्रमाणे सौ. शलमोन अढाव, व ज्वेलअढावयांनी तु येथून निघून जा, असे म्हणून हाकलून दिले. या तक्रारीवरुन पोलिसांनी बिंदू अढाव, शलमोन अढाव व ज्वेल अढाव यां तिघांविरुध्द कलम २९४, ३२३, ३४ भादंविनुसार गुन्हा दाखल केला.

# आगामी लोकसभा निवडणुक अनुषंगाने निवडणुक निरीक्षक श्री सेंथील कुमार यांची पोलीस नियंत्रण कक्षाची पाहणी

**जनसंचलन/बुलढाणा**

दि.१८ एप्रिल रोजी केंद्रीय निवडणुक आयोगा तर्फे नेमण्यात आलेले निवडणूक निरीक्षक श्री. सेंथील कुमार (भा.पो.से.) यांनी बुलढाणा-५ मतदारसंघाच्या दि.२६/०४/२०२४ रोजी होणा-या आगामी मतदान व निवडणूक प्रक्रीयेच्या सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करणेच्या अनुषंगाने पोलीस नियंत्रण कक्ष बुलढाणाची पाहणी केली व तयारीचा आढावा घेतला. केंद्रीय निवडणुक आयोगकडुन बुलढाणा जिल्हा पोलीस विभागा करीता श्री सेंथील कुमार (भारतीय पोलीस सेवा) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. दि.०२/०४/२०२४ पासून ते बुलढाणा जिल्हयात उपस्थीत असून बुलढाणा जिल्हा पोलीस दल व केंद्रीय निवडणूक आयोग यांच्यामधे समन्वयाची भुमिका पार पाडत आ-हेत. लोकसभा निवडणूक शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडावी या करीता जिल्हयात असलेल्या स्ट्राँग रूम, स्टॅटीक सर्वेलन्स टीम, स्थानिक पोलीस स्टेशन व संवेदनशील ठिकाणी भेटी देउन परीस्थीतीचा आढावा घेत आहेत व पोलीसद-लाला मार्गदर्शन करीत आहेत. आज रोजी त्यांनी नियंत्रण कक्ष बुलढाणा येथे भेट देउन जिल्हात सर्वत्र योग्य संपर्क यंत्रणा कार्यरत असल्या बाबतची पाहणी केली. पोलीस बिनतारी संदेश यंत्रणा,




डायल ११२ यंत्रना, तसेच नियंत्रण कक्षातील माहितीच्या अदाण प्रदाण करणा-या व्यवस्थेची पाहणी केली. सदर ठिकाणी आगामी लोकसभा निवडणूक संबंधाने बुलढाणा जिल्हा पोलीस दलातर्फे केलेल्या तयारीवर समाधान व्यक्त केले. नियंत्रण कक्षातच स्टॅटीक सर्वेलन्स टीमवर (स्थिर निगराणी पथके) निगराणी ठेवणे करीता व लोकसभा निवडणूक सुचना देण्याकरीता नियंत्रण कक्षातच स्क्रिन उभाराव्यात अशी सुचना केली. डायल ११२ वर येणा-या निवडणूक आचारसंहिता भंगाबाबतच्या तक्रारी व निवडणूकीशी संबंधीत तक्रारी यांना प्राधान्या देउन योग्य कायदेशीर कारवाई करावी. बिनतारी संदेश यंत्रणेचा वापर अधीक प्रभावी पध्द-तीने वापर करावा याशिवाय प्रशी-क्षित मनुष्य बळ हजर ठेवावे. सुरक्षे संबंधाने सर्व नोंदी नियंत्रण कक्ष येथे घ्याव्यात अशा सुचना दिल्यात. सदर पाहणी दौरा करतेवेळी श्री. सुनिल कडासणे जिल्हा पोलीस अधीक्षक, श्री. बी.बी.महामुनी अपर पोलीस अधीक्षक, श्री. सुधीर पाटील, उपविभागीय पोलीस अधीकारी बुलढाणा, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह), श्री. गजानन कांबळे, पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा, श्री. दिनकर गावित, पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश, श्रीमती वंदना विरणक, नियंत्रण कक्ष अधिकारी, हे हजर होते.

# बहिणीच्या चारित्र्यावर संशय घेतल्याने जावयासह वडिलांना केली मारहाण

**जनसंचलन/ खामगाव**

बहिणीच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याच्या कारणावरुन तिघांनी संगनमत करून जावई आणि त्याच्या वडिलांना मारहाण केली. सोमवारी रात्री घडलेल्या या घटनेप्रकरणी तिघांविरोधात मंगळवारी गुन्हा दाखल झाला. स्थानिक सावजी ले आऊटमधील विजय वाडेकर रात्री घरी होते. त्यावेळी रघुनाथ घोपे आणि गणेश घोपे (दोघेही रा. भालेगाव बाजार), लकी घोपे, हे तिघे वाडेकर यांच्या घरी आले. बहिणीच्या चारित्र्यावर



संशय घेत, ती दारू पिते म्हणून त्रास देत असल्याचा जाब विचारत त्यांना फावड्याच्या दांड्याने रघुनाथ, गणेश, लकी घोपे यांनी मारहाण केली. तक्रारीवरून शहर पोलिसांनी तिन्ही आरोपींविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ. गजानन पाटील करीत आहेत.

# पाणीटंचाई निवारणासाठी काळेगाव,मुर्ती येथे टँकर मंजूर

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील काही तालुक्यात सद्यस्थितीत पिण्याच्या स्त्रोतापासून आवश्यक पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. दरडोई दरदिवशी २० लिटर्स उपलब्ध होण्यासाठी पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजना म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. मौजे काळेगाव, मौजे मुर्ती, ता. मोताळा येथे प्रत्येकी एक टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. काळेगाव व मुर्ती गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे सदर गावामधील पाणी टंचाई कमी होण्यास मदत होणार आहे, असे उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांनी कळविले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निवडणूक विभाग मतदारराजाचे दारी जिल्ह्यात २१ एप्रिलपासून घरून मतदानाला सुरूवात...

**जनसंचलन/बुलडाणा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४मध्ये प्रथमच ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक, तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले दिव्यांग मतदारांनी विहीत मुदतीत केलेल्या मागणीनुसार त्यांना घरपोच मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यात २ हजार १७१ ज्येष्ठ नागरिक आणि ६९२ दिव्यांग असे एकूण २ हजार ८६३ मतदारांच्या घरी जाऊन मतदान पथकामार्फत मतदान करुन घेण्यात येणार आहे. हे मतदान टपाली मतपत्रिकेद्वारे होणार असून बुलढाणा लोकसभा मतदारसंघात या कामासाठी १०१ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यात दि. २१ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान सदर मतदान प्रक्रिया होणार आहे. बुलडाणा विधानसभा मतदारसंघात ११२ ज्येष्ठ नागरिक, ८४ दिव्यांग असे १९६, चिखली विधानसभा मतदारसंघात ३१८ ज्येष्ठ नागरिक, ९६ दिव्यांग असे ४१४, सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात ५३९ ज्येष्ठ नागरिक, ८९ दिव्यांग असे ६२८, मेहकर विधानसभा मतदारसंघात ८२० ज्येष्ठ नागरिक, २८३ दिव्यांग असे सर्वाधिक १ हजार १०३, खामगाव विधानसभा मतदारसंघात १२० ज्येष्ठ नागरिक, ८३ दिव्यांग असे २०३, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात २६२ ज्येष्ठ नागरिक, ५७ दिव्यांग असे ३१९, असे २ हजार १७१ आणि दिव्यांग ६९२ असे एकूण २ हजार ८६३ मतदारांना घरपोच मतदान सुविधेचा लाभ देण्यात येणार आहे.

८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार असलेल्या बुलडाणा विधानसभा मतदारसंघ येथे १९६ मतदारांसाठी १० पथक, चिखली येथे ४१४ मतदारांसाठी २० पथक, सिंदखेड राजा येथे ६२८ मतदारांसाठी १९ पथक, मेहकर येथे १ हजार १०३ मतदारांसाठी ३२ पथक, खामगाव येथे २०३ मतदारांसाठी १० पथक, जळगाव जामोद येथे ३१९ मतदारांसाठी १० पथक, असे एकूण १०१ पथक दि. २१ एप्रिलपासून घरोघरी जाऊन मतदान प्रक्रिया राबवणार आहे. सदर मतदान पथकांमध्ये २ मतदान अधिकारी हे सुक्ष्म निरीक्षक, १ व्हिडीओग्राफर, १ पोलिस कर्मचारी यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर मतदान प्रक्रिया पारदर्शीपणे, तसेच मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी उमेदवार स्वत: अथवा आपला प्रतिनिधी नियुक्त करुन मतदान प्रक्रियेचे निरीक्षण करु शकतात. याप्रक्रियेमध्ये मतदारांना टपाली मतपत्रिकेवर खुण करुन आपले मतदान नोंदविता येईल. तसेच मतदान नोंदविल्यानंतर मतदारांच्या बोटाला पक्की शाईची खुण करण्यात येणार आहे. तसेच या संपूर्ण प्रक्रियेचे टिमकडून चित्रीकरण केले जाणार आहे. अंध व्यक्तींसाठी मतदान करताना विशेष सोय करण्यात आली आहे. निवडणुकीत २१ उमेदवार आणि १ नोटा असल्याने मतपत्रिकेचे दोन भाग असणार आहे. एका मतपत्रिकेवर १६ उमेदवार आणि उर्वरीत उमेदवार दुसऱ्या मतपत्रिकेवर असणार आहे. अंध व्यक्तींसाठी ब्रेल लिपीतील मतपत्रिका पुरविण्यात येणार आहे.



तसेच अंध दिव्यांग व्यक्तींना सोबत्याची मदत घेऊन देखील मतदान करता येणार आहे. दररोज मतदान संपल्यानंतर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात सर्व पथकातील टपाली मतपत्रिकेचे एकत्रिकरण करण्यात येवून सर्व टपाली मतपत्रिकेचे पाकिटे हे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील स्ट्राँगरुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान पथकांचा तारखेनिहाय नियोजन केलेले असून त्यास मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली आहे. याबाबत मतदार, तसेच उमेदवार यांनादेखील कळविण्यात आले आहे. तरी या कालावधीत उपरोक्त मतदारांनी बाहेरगावी जाऊ नये, अथवा गैरहजर राहू नये, तसेच सदर मतदान प्रक्रियेचा लाभ घेऊन सर्व मतदारांनी मतदान करावे व लोकशाहीच्या या उत्सवामध्ये आपला सहभाग नोंदवून लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी या घटकाने पुढे येऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# लोकसभा निवडणुकीत मतदारांनी सक्रीय सहभाग नोंदवावा-विभागीय आयुक्त निधी पाण्डेय

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकशाहीचा उत्सव असलेल्या लोकसभा निवडणुकीत सर्व घटकांनी सक्रीय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, युवक, तृतीयपंथी यांच्या सर्व मतदारांनी मतदानासाठी समोर येऊन मतदान करावे, तसेच मतदानासाठी इतरांना प्रोत्साहित करण्यासाठी पुढाकार घेऊन मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे आवाहन विभागीय आयुक्त निधी पाण्डेय यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने श्रीमती पाण्डेय यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात दिव्यांग आणि तृतीयपंथी मतदारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी दिव्यांग आणि तृतीयपंथी यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांना मतदान करण्यासाठी शपथ दिली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील विंचरकर, निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, समाज कल्याण सहायक आयुक्त अनिता राठोड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत आदी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीच्या तयारी आढावा घेताना श्रीमती पाण्डेय यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षास भेट दिली. त्यांनी मतदार हेल्पलाईन, सी-व्हिजील, सीसीटीव्ही यंत्रणा आदींची माहिती घेतली. मतदार हेल्पलाईनवर येणाऱ्या दूरध्वनीबाबत कॉलसेंटरप्रमाणे उपस्थित कर्मचारी यांनी आपली ओळख द्यावी. त्यानंतर त्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, ही माहिती देताना नम्रपणे ही माहिती देण्यात यावी. निवडणुकीच्या कालावधीत नियंत्रण कक्ष महत्वाची भूमिका बजावित असते. या





कक्षाने इतर नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहावे. जिल्ह्याला इतर राज्याची सिमा आहे. याठिकाणी असलेल्या चेकपोस्टवरील यंत्रणा सक्षमपणे सुरू ठेवावी. निवडणुकीसाठी उभारण्यात आलेल्या स्थिर सर्वेक्षण पथकाच्या ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. फिरत्या पथकांना जीपीएस यंत्रणा बसविण्यात आली आहे. यावेळी त्यांनी थांबलेल्या पथकांशी संपर्क साधून माहिती घेतली.

लोकसभा निवडणुकीसाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. महिला मतदारांची टक्केवारी अधिक आहे. त्यामुळे मतदानाच्या प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घ्यावे. ही निवडणूक मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडाव्यात यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्रीमती पाण्डेय यांनी यावेळी केले. लोकसभा निवडणुकीसाठी प्रत्येक घटकांचा सहभाग वाढविण्यासाठी विविध घटकांशी संवाद साधून त्यांचा सहभाग नोंदवून घेण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज श्रीमती पाण्डेय यांनी दिव्यांग आणि तृतीयपंथी मतदारांशी संवाद साधला. यावेळी त्यांना मतदान करण्याबाबत शपथ देण्यात आली. तसेच तृतीयपंथी आणि दिव्यांग मतदारांच्या समस्या जाणून घेतल्या. मतदान केंद्रावर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना व्हील चेअर आणि मतदान केंद्रावर जाण्या-येण्याची व्यवस्था करण्याबाबत माहिती घेतली.

# आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**जनसंचलन/बुलडाणा**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम सन २००९ नुसार खाजगी विना अनुदानित, कायम विना अनुदानित, स्वयंअर्थ सहाय्यीत शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित आणि दुर्बल घटकातील मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. त्यानुसार या प्रवेश प्रक्रियेला सुरवात करण्यात आली आहे यावर्षी २०२४-२५ या वर्षातील आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे. त्यानुसार पालकांना आपल्या पाल्याचा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाल्याचे कळविण्यात आले आहे. सन २०२४-२५ या





वर्षातील आरटीई २५ टक्के प्रक्रियेचे अर्ज पालकांना दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येईल. तसेच शासनाच्या २५ rte25admission.maharashtra.gov.in या वेबसाईटपी अधिक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जिल्ह्यातील पालकांनी प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाने केले आहे.

# विभागीय आयुक्तांनी घेतला लोणार विकास आराखड्याचा आढावा

## विकासकामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश

**जनसंचलन/बुलडाणा**

लोणार विकास आराखड्यातील कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येत आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार ही कामे करण्यात येत आहे. लोणार सरोवराला वैज्ञानिक महत्व असून जागतिक स्तरावरील पर्यटनस्थळ आहे. त्यामुळे यंत्रणांना सोपविण्यात आलेली विकास कामे निश्चित कालावधीत पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्त निधी पाण्डेय यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात लोणार विकास आराखड्यातील कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती पाण्डेय यांनी, न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे गोमुख परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा पर्यटकांची गैरसोय होणार नाही अशा पद्धतीने बसविण्याची कार्यवाही पुरातत्व विभागाने करावी. याबाबत तातडीने कार्यवाही करून कामे पूर्ण करण्यात यावीत. तसेच गोमुख परिसरात येणाऱ्या पर्यटकांना वाहने ठेवण्यासाठी अडचणी येत असल्यामुळे प्रवेशद्वाराजवळील अतिक्रमण काढून याठिकाणी वाहनतळ करण्यात यावा.लोणार सरोवराला वैज्ञानिक महत्व आहे. त्यामुळे सरोवरातील पाण्याचे नमुने नियमित पद्धतीने घेण्यात यावेत, याची तपासणी करण्यात यावी. नमुन्यांचे विश्लेषण करण्यात यावे. वैज्ञानिकांच्या बैठक नियमित स्वरूपात घेण्यात याव्यात. दुर्गा टेकडीवरील प्रयोगशाळा हस्तांतरणाची प्रक्रिया गतीने होण्यासाठी प्रयत्न करावेत. सांडपाणी सरोवरामध्ये जाऊ नये यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प तातडीने



पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करावेत. पावसाळ्यात हे पाणी सरोवरामध्ये जाणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. लोणार बायपास, लोणार-मंठा आणि लोणार किन्ही या रस्त्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. याबाबत भूसंपादनाची कामे नियमानुसार करण्यात यावीत. तसेच लोणार येथे पर्यटकांना राहण्यासाठी अपुरी सुविधा असल्यामुळे पर्यटन विकास महामंडळाने याबाबत कार्यवाही करावी, असे निर्देशही श्रीमती पाण्डेय यांनी दिले.

# महायुतीमधील जागांचा पेच सुटल्यात जमा शिंदेंना तीन जागा मात्र त्या २ मतदारसंघांचाही समावेश?

वृत्तसंस्था/मुंबई

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारतोफा थंडावल्या आहेत. मात्र तरीही महायुतीमधील जागांचा पेच कायम आहे. उद्या विदर्भातील ५ जागांसाठी मतदान होत आहे. दुसरीकडे महायुतीत अद्यापही काही जागांवरुन रस्सीखेच आहे. शिंदेंच्या शिवसेनेनं रत्नागिरी-सिंधुदुर्गवरील दावा सोडत ही जागा भाजपला दिली आहे. भाजपनं इथून केंद्रीय मंत्री नारायण राणेंना उमेदवारी दिली आहे. त्यानंतर आता महायुतीमधील अन्य जागांचा तिढा संपल्याचं वृत्त आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग भाजपला सोडणाऱ्या शिवसेनेला ठाणे, नाशिक आणि औरंगाबाद या तीन जागा देण्याची तयारी भाजपनं दर्शवली आहे. या तिन्ही जागा शिवसेना आणि भाजपनं प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. तिन्ही जागा गेल्या निवडणुकीत शिवसेनेनं लढवल्या. पैकी ठाणे, नाशिकची जागा सेनेनं जिंकली. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये सेनेचे तत्कालीन खासदार चंद्रकांत खैरे यांचा निसटता पराभव झाला. ठाण्याचे खासदार राजन विचारे पक्षफुटीनंतर उद्धव ठाकरेंसोबत राहिले. तर नाशिकचे खासदार हेमंत गोडसेंनी शिंदेंना साथ दिली. नाशिकच्या जागेवर भाजप, राष्ट्रवादीनं दावा केला होता. पण ही जागा सेनेला मिळणार असल्याचं वृत्त लोकमतनं दिलं आहे. छत्रपती संभाजीनगरमधून भाजपचा उमेदवार निवडून द्या, असं आवाहन केंद्रीय मंत्री अमित शहांनी जाहीर सभेतून केलं होतं. त्यामुळे ही जागा प्रतिष्ठेची झाली. तर मुख्यमंत्री शिंदेंचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यावरही भाजपच्या स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दावा सांगितला. पण छत्रपती संभाजीनगर आणि ठाण्याची जागा मिळवण्यात शिंदेंना यश आल्याचं दिसतं.



नाशिकमधून विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांनाच उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. तर ठाण्यातून आमदार प्रताप सरनाईक आणि छत्रपती संभाजीनगरातून संदीपान भुमरे यांना तिकिट मिळू शकतं. सेनेनं रत्नागिरी-सिंधुदुर्गची जागा भाजपला सोडल्यानं केंद्रीय मंत्री नारायण राणेंना लोकसभा लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भाजपनं त्यांना उमेदवारी दिली आहे. या जागेसाठी सेना नेते आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत आग्रही होते. पण त्यांनी माघार घेतली आहे. याची घोषणा सामंत बंधूंनी आज पत्रकार परिषद घेऊन केली.

# सागवनच्या भूमिपुत्राची कन्या झाली कलेक्टर...

जनसंचलन/बुलढाणा

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल १६ एप्रिलला जाहीर करण्यात आला. यंदा यूपीएससीच्या परीक्षांमध्ये १०१६ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी जवळपास ८.६ टक्के महाराष्ट्रातील आहेत. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील तीन उमेदवारांचा समावेश आहे. ज्यात बुलढाणा जिल्ह्यातील सागवन येथील नेहा राजपूत हिने ५१ वा क्रमांक पटकवला आहे. उद्धवसिंग राजपूत यांची कन्या नेहा हिने युपीएससीत दैदीप्यमान यश प्राप्त केल्याने जिल्ह्यातील लोकांकडून तिच्यावर कौतुकांचा व शुभेच्छांचा पाऊस पडत आहे. बुलढाण्याच्या भूमिपुत्राच्या कन्येने आपल्या प्रगतीने आकाशाला गवसणीच घातली आहे. नेहा हिचे संपूर्ण शिक्षण जळगाव येथे झाले आहे. मुंबईमधून तिने एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. प्राप्त माहितीनुसार डॉ. नेहा यांचे वडील उद्धवसिंग हे जळगाव येथे समाज कल्याण विभागामध्ये नोकरीवर कार्यरत होते. ते आता सेवानिवृत्त आहेत. उद्धवसिंग यांची शेती आणि घर सागवन मध्येच असून डॉ. नेहाच्या यशाने त्यांच्या



संपूर्ण नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. लवकरच डॉ. नेहा यांचा बुलढाणा शहरात सत्कार आयोजित केला जाणार असल्याची माहिती मिळत आहे.सप्टेंबर २०२३ मध्ये यूपीएससीची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. तर जानेवारी ते एप्रिल २०२४ दरम्यान यूपीएससीच्या मुलाखती पार पडल्या. मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेले साधारण २८४६ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले होते. सदर परीक्षेचे निकाल आज १६ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आले आहेत. उमेदवारांची गुणांची मार्कशिट १५ दिवसानंतर जाहीर करण्यात येणार आहे.यूपीएससी सिव्हिल सेवा परीक्षा २०२३ अंतर्गत आयएएस, आयपीएस, आयएफएस सहित सर्व्हिसेसमध्ये ११४३ पदांची भरती निघाली होती. यामध्ये आयएएसच्या १८० जागा, आयपीएसच्या २०० तर आयएफएसच्या ३७ रिक्त जागा भरण्यात येणार आहेत.

# पतीच्या अनैतिक संबंधाची वाच्यता केल्याने सासरच्या मंडळीने २८ वर्षीय विवाहितेचा केला शारीरिक व मानसिक छळ...

जनसंचलन/नांदूरा

पतीच्या अनैतिक संबंधाची वाच्यता केल्याने सासरच्या मंडळीकडून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची फिर्याद पोलीस स्टेशन नांदुरा येथे १७ एप्रिल रोजी दाखल करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालय यांचे क्र. पो. अ. बु. / म बाअ प्र क अर्ज चौकशी २०२४- ४०१ १५ एप्रिल २०२४ प्रमाणे पोस्टेला आवक क्रमांक ८०५/ २४ प्रमाणे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावरून अर्जदार सौ प्रतिमा सौरभ सपकाळरा. निमगावयांनी गैरअर्ज सौरभ सपकाळ व इतर सासरचे नातेवाईक यांचे विरुद्ध तक्रार अर्ज दिल्याने व स्वतः पोलीस स्टेशनला हजर आल्याने कायमी केली. त्यामध्ये फिर्यादी सौ. प्रतिमा सौरभ सपकाळ वय २८ वर्ष व्यवसाय घरकाम रा. निमगाव यांनी नांदुरा पोस्टेला फिर्याद दिली की, यातील नमूद फिर्यादी हिचे आरोपी पती सौरभ भीमराव सपकाळ वय ३० वर्ष, भीमराव भिकाजी सपकाळ वय ६५ वर्ष, वत्सला भीमराव सपकाळ वय ६० वर्ष, राणी अविनाश सपकाळ व ३० वर्ष सर्व राहणार नवीन सोनखास बायपास रोड मंगरूळपीर, यातील आरोपी क्रमांक १ सोबत सामाजिक रीतीरिवाजाप्रमाणे २४ नोव्हेंबर २०१९ रोजी लग्न झाले नमूद आरोपींना फिर्यादीपासून मुलाची अपेक्षा होती. परंतु तिला आरोपी क्रमांक १ पासून २८ जून २०२१ रोजी १ मुलगी झाली. त्या कारणावरून आरोपी क्रमांक १ ते ४ यांनी फिर्यादीचा छळ करणे सुरू केले. तसेच तुझे आई-वडिलांनी लग्नामध्ये हुंडा कमी दिला तू आता माहेरवरून ४ चाकी गाडी घेणे करिता १५ लाख रुपये घेऊन ये, त्याचप्रमाणे फिर्यादीस तिचे पती आरोपी क्रमांक १ व आरोपी क्रमांक ४ यांचे अनैतिक संबंध असल्याचे दिसल्याने तिने त्याची वाच्यता वरील आरोपीसमोर केली



त्या कारणावरून सुद्धा नमूद आरोपी यांनी फिर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ करून मारहाण करून शिवीगाळ केली व जीवाने मारून टाकण्याची धमकी दिली.अशा लेखी तक्रार अर्जावरून आरोपी पती सौरभ भीमराव सपकाळ, भीमराव भिकाजी सपकाळ, वत्सला भीमराव सपकाळ व राणी अविनाश सपकाळ यांचे विरुद्ध कायमी अपराध क्रमांक २७४/२०२४ कलम ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नांदुरा ठाणेदार विलासराव पाटील यांचे आदेशाने पोहेकॉ गजानन इंगळे यांचेकडे देण्यात आला आहे.

# संदीपदादा शेळके यांच्या प्रचार रॅली ला जळगाव जामोदात उस्फुर्त प्रतिसाद



जनसंचलन/ज.जामोद

शाहू पतसंस्थाचे अध्यक्ष तथा वन मिशनचे संस्थापक अध्यक्ष लोकसभेचे उमेदवार संदीप शेळके जिल्हाभर झंझावाती प्रचार दौरे करीत आहेत. त्यांना सामान्य मतदारांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळताना दिसतोय. आज दि १८ एप्रिल रोजी जामोद, येथे संदीपदादा शेळके यांचा रोड शो संपन्न झाला .यावेळी गावातील प्रमुख मार्गाने प्रचार रॅली काढत संदीप दादा शेळके यांनी गावातील जनतेसोबत संवाद साधला यावेळी संदीप दादा शेळके यांनी मतदारांना आश्वासन दिले की जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन हाच माझ्या प्रचाराचा मुद्दा राहील जनतेने लोकसभेत पाठवल्यानंतर खासदार म्हणून नव्हे तर तुमचा सेवक म्हणून नोकर म्हणून विश्वस्त म्हणून मी काम करेल असा शब्द जनतेला दिला.संदिपदादा शेळके यांनी संपूर्ण जिल्ह्याचा दौरा करून स्थानिक लोकांच्या समस्या समजून घेतल्या आहे आणि त्या समस्याचे काम ते करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958